आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

४ ऑक्टोबर २०२४ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याच्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या निर्णयाचं महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात स्वागत

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या महाराष्ट्राच्या दौऱ्यावर/२३ हजार कोटी रुपये खर्चाच्या कृषी आणि पशुसंवर्धन उपक्रमांचा करणार प्रारंभ तसंच किसान सन्मान निधीच्या १८ व्या हप्त्याचं करणार वितरण

- स्वातंत्र्यप्राप्तीच्या शतकमहोत्सवापर्यंत भारत नवकल्पना, तंत्रज्ञान आणि संस्कृतींच्या देवाणघेवाणीचं केंद्र बनलेला असेल असं केंद्रीय अर्थमंत्र्यांचं प्रतिपादन

- हरयाणा विधानसभा निवडणुकीसाठीची पूर्वतयारी पूर्ण

**आणि**

- महिला टी-ट्वेंटी क्रिकेट विश्व चषक स्पर्धेत आज भारताचा पहिला सामना न्यूझीलंडबरोबर रंगणार

**<><><><><>**

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय काल केंद्रीय मंत्रिमंडळानं घेतला. या निर्णयाचं महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात स्वागत होत आहे. राज्यपाल सीपी राधाकृष्णन यांनी या निर्णयाचं स्वागत केलं आहे, तसंच राज्यातल्या जनतेच्या वतीने प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि मंत्रिमंडळाचे आभार मानले आहेत.
उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या निर्णयावर प्रतिक्रीया देताना सांगितलं....

**बाईट- फडणवीस**

गेल्या अनेक दशकांची महाराष्ट्राची ही मागणी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यामुळे पूर्ण झाली असल्याचं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी म्हटलं असून त्याबद्दल सर्व मराठी भाषाप्रेमींचे अभिनंदन केलं आहे. तसंच केंद्रसरकारचे आभार मानले आहेत.

याखेरीज विविध राजकीय पक्ष, भाषाक्षेत्रात काम करणाऱ्या संघटना, संस्था आणि साहित्य वर्तुळातल्या अनेक मान्यवरांनी या निर्णयाबद्दल आनंद व्यक्त केला आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या महाराष्ट्राच्या दौऱ्यावर येणार आहेत. या दौऱ्यादरम्यान उद्या सकाळी वाशिममध्ये सुमारे २३ हजार कोटी रुपयांच्या कृषी आणि पशुसंवर्धन क्षेत्राशी संबंधित विविध उपक्रमाचा प्रारंभ त्यांच्या हस्ते होणार आहे. सकाळी साडे अकरा वाजता बंजारा विरासत संग्रहालयाचं उद्घाटन प्रधानमंत्री करतील. यावेळी प्रधानमंत्री २० हजार कोटी रुपयांच्या प्रधानमंत्री किसान सन्मान निधीचा १८ वा हप्ता वितरित करतील. तसंच प्रधानमंत्री नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेच्या सुमारे २ हजार कोटी रुपयांच्या ५ व्या हप्त्याचा प्रारंभ करतील. कृषी पायाभूत सुविधा निधी अंतर्गत १ हजार ९२० कोटी रुपयांचे साडे सात हजाराहून अधिक प्रकल्प राष्ट्राला समर्पित करतील. तसंच मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेअंतर्गत राज्यात एकूण १९ मेगावॅट क्षमतेचे पाच सौर ऊर्जा पार्कचं प्रधानमंत्री उद्घाटन करणार आहेत. यावेळी प्रधानमंत्री मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेच्या लाभार्थ्यांचाही सन्मान करतील.

त्यानंतर दुपारी ४ वाजता ठाण्यामध्ये ३२ हजार ८०० कोटी रुपयांच्या विविध विकास प्रकल्पांचं उद्घाटन आणि पायाभरणी प्रधानमंत्र्यांच्या हस्ते होणार आहे. सुमारे १२ हजार २०० कोटी रुपयांच्या ठाणे इंटिग्रल रिंग मेट्रो रेल्वे प्रकल्पाची आणि सुमारे ३ हजार ३१० कोटी रुपयांच्या छेडा नगर ते आनंद नगर या

ईस्टर्न फ्रीवेच्या एलिव्हेटेड विस्ताराची पायाभरणीही ते करतील. ठाणे महापालिकेच्या उच्चस्तरीय प्रशासकीय इमारतीची पायाभरणीही त्यांच्या हस्ते होणार आहे. प्रधानमंत्र्यांच्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर काल संध्याकाळी ठाण्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी तयारीचा आढावा घेतला. त्यानंतर संध्याकाळी ६ वाजता, बीकेसी ते आरे जेव्हीएलआरपर्यंत धावणाऱ्या मेट्रो ट्रेनला बीकेसी मेट्रो स्टेशनवरून ते हिरवा झेंडा दाखवतील. यावेळी ते मेट्रोनं प्रवास करणार आहे. तसंच सुमारे २ हजार ५५० कोटी रुपयांच्या नवी मुंबई विमानतळाच्या फेज-१ ची प्रधानमंत्री पायाभरणी करतील.

**<><><><><>**

देशातली प्रमुख बंदरं आणि गोदी कामगार मंडळाचे कर्मचारी आणि कामगारांसाठी उत्पादकतेशी संलग्न मोबदला योजनेत सुधारणा लागू करायला केंद्रीय मंत्रिमंडळाने काल मंजुरी दिली. ही सुधारणा वर्ष २०२०-२१ ते २०२५-२६ या कालावधीसाठी लागू असेल. या योजनेमुळे सुमारे २० हजार ७०४ कर्मचारी आणि कामगारांना लाभ मिळणार आहे. बंदर निहाय कामगिरीला असलेलं महत्त्व ५० टक्के वरून वाढवून आधी ५५ टक्के आणि त्यानंतर ६० टक्के इतकं वाढवून वार्षिक तत्त्वावर हा मोबदला दिला जाईल.

२०२४-२५ ते २०३०-३१ या ७ वर्षांसाठी तेलबिया आणि खाद्यतेल निर्मितीला प्रोत्साहन देण्यासाठी १० हजार १०३ कोटी रुपयांच्या खर्चाच्या राष्ट्रीय अभियानालाही केंद्रिय मंत्रीमंडळानं मान्यता दिली. मोहरी, भुईमूग, सोयाबीन, सूर्यफूल आणि तीळ यासारख्या प्रमुख तेलबियांचं उत्पादन वाढवण्यावर भर देण्यात येणार आहे. कापसाची सरकी, भाताची फोलपटं आणि इतर स्त्रोतांपासून तेलनिर्मिती वाढवण्यावर भर दिला जाईल.

रेल्वे कर्मचाऱ्यांना ७८ दिवसांचा उत्पादकता बोनस यंदा मिळणार आहे. यासाठी एकंदर २ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्याला केंद्रीय मंत्रिमंडळाने काल मंजुरी दिली. याचा लाभ ११ लाख ७२ हजार कर्मचाऱ्यांना मिळणार आहे.

**<><><><><>**

मराठी पाली, प्राकृत आसामी आणि बंगाली भाषांना अभिजात दर्जा देण्याचा निर्णय घेतल्याबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी समाधान व्यक्त केलं आहे. त्याखेरीज राष्ट्रीय तेलबिया आणि खाद्यतेल अभियान, चेन्नई मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यला मंजुरी इत्यादी निर्णयांबद्दलही मोदी यांनी आनंद व्यक्त केला आहे.

**<><><><><>**

भारतीय स्वातंत्र्याला २०४७मध्ये शंभर वर्षं पूर्ण होत असताना विकसित झालेला भारत हा नवकल्पना, तंत्रज्ञान आणि संस्कृतींच्या देवाणघेवाणीचं केंद्र बनलेला असेल असं प्रतिपादन केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज नवी दिल्ली इथं केलं. कौटिल्य इकोनॉमिक कॉनक्लेव्हच्या तिसऱ्या आवृत्तीत त्या बोलत होत्या. हजारो वर्षांपासून भारताने तत्त्वज्ञान, राजकारण, विज्ञान आणि कला या क्षेत्रांमध्ये जे योगदान दिलं आहे, त्याचा विस्तार जगभरात झाला आणि भारताच्या या सामर्थ्याचा उर्वरित जगाला फायदा झाला असंही त्या म्हणाल्या.

तीन दिवस चालणाऱ्या या कॉनक्लेव्हमध्ये हरित संक्रमणासाठी आवश्यक असलेला वित्तपुरवठा, आर्थिक प्रगतीच्या अनुषंगाने होणारे आर्थिक-भौगोलिक विखंडनाचे परिणाम तसंच, धोरणात्मक तत्व आणि आर्थिक लवचिकता या संकल्पनांवर चर्चा होईल. तसंच, भारतीय अर्थव्यवस्था आणि ग्लोबल साऊथच्या अर्थव्यवस्थांना भेडसावणाऱ्या काही मुद्द्यांवर भारतीय आणि आंतरराष्ट्रीय तज्ज्ञांमध्ये चर्चाही होणार आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज संध्याकाळी या कॉनक्लेवला संबोधित करणार आहेत.

**<><><><><>**

महाराष्ट्रातली बौद्ध धर्माशी संबंधित तीर्थस्थळं आणि डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्याशी संबंधित स्थळं तसंच स्मारकं यांचा विकास करण्यात येणार असल्याचं केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू यांनी आज सांगितलं. नागपूरमधे पवित्र दीक्षाभूमीचं दर्शन घेतल्यानंतर ते माध्यम प्रतिनिधींशी बोलत होते. या कामासाठी संबंधित सामाजिक संस्था आणि शैक्षणिक संस्था या सर्वांसोबत समन्वय साधण्यात येणार असल्याचं ते म्हणाले. किरेन रिजीजू आज प्रदेश भाजपा कार्यालयातर्फे आयोजित बैठकीत सहभागी होणार असून, अनुसूचित जाती मोर्चाच्या एका बैठकीला संबोधित करणार आहेत.

**<><><><><>**

हरयाणा विधानसभा निवडणुकीसाठीची पूर्वतयारी पूर्ण झाली आहे. हरयाणात ९० मतदारसंघांसाठी उद्या एकाच टप्प्यात निवडणूक होणार आहे. या निवडणुकीसाठी १ हजार ३१ उमेदवार रिंगणात आहेत. उद्या सकाळी सात ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत मतदानाची वेळ असेल. राज्यातले २ कोटी ३ लाख ५४ हजारहून अधिक मतदार उमेदवारांचं भविष्य ठरवतील. या निवडणुकीसाठी एकूण २० हजार ६३२ मतदान केंद्र उभारण्यात आली आहेत.

**<><><><><>**

महिला टी-ट्वेंटी क्रिकेट विश्व चषक स्पर्धेत आज भारताचा पहिला सामना न्यूझीलंडबरोबर होणार आहे. आज संध्याकाळी दुबईत इथं होणाऱ्या या सामन्याचं थेट प्रसारण आणि समालोचन आकाशवाणीवरून होणार आहे. सामना साडेसात वाजता सुरु होईल. वेस्ट इंडिज आणि दक्षिण आफ्रिका यांचा सामना आज दुपारी साडेतीन वाजता होणार आहे. या स्पर्धेत दहा संघ उतरले असून अंतिम सामना २० ऑक्टोबरला होणार आहे.

काल सलामीच्या सामन्यात बांगलादेशानं स्कॉटलंडवर १६ धावांनी विजय मिळवला. तर पाकिस्ताननं श्रीलंकेला ३१ धावांनी पराभूत केलं.

**<><><><><>**

तिरुपती मंदिरातल्या प्रसादात भेसळयुक्त तूप वापरल्या प्रकरणी आरोपांची चौकशी करण्यासाठी स्वतंत्रपणे विशेष तपास पथक नेमण्याचे आदेश आज सर्वोच्च न्यायालयाने दिले. या पथकात दोन सीबीआय अधिकारी आणि आंध्र प्रदेश पोलीस खात्याचे दोन अधिकारी तसंच FSSAI च्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याचा समावेश असेल. सीबीआयचे संचालक या तपासावर देखरेख करणार आहेत. या प्रकरणात दाखल झालेल्या विविध याचिकांवर आज सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. न्यायालयाच्या निर्णयाचा राजकीय वापर करू नये, असे निर्देशही यावेळी न्यायालयाने दिले आहेत.

**<><><><><>**

भारतीय हवामान विभागाने ईशान्य आणि दक्षिण भारताच्या काही भागांमध्ये आज जोरदार ते अति जोरदार पावसाचा अंदाज वर्तवला आहे. केरळ, तामिळनाडू, कर्नाटक, रायलसीमा आणि पश्चिम बंगालमध्ये मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

**//<><><><><>//**